# नववर्षाच्या स्वागताकरिता शहरात पोलीसांचा अलर्ट

## थर्टी फस्टच्या दिवशी शहरातील उड्डाणपूल राहणार बंद

### 80 पोलीस अधिकारी आणि 800 पोलीस राहणार तैनात




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** 31 डिसेंबर रोजी नवीन वर्षांच्या शेवटच्या दिवशी सायंकाळपासून अमरावती शहरात पोलिसांचा चोख बंदोबस्त लावला जाणार आहे. पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्या नेत्तृत्वात तीन्ही पोलिस आयुक्त, पाच सहायक पोलिस आयुक्त, 80 पोलिस अधिकारी आणि तब्बल 800 पोलिस रस्त्यावर उतरून नागरिकांच्या सुरक्षेसाठी तैनात राहणार आहे.

शहरात नववर्षाचे उत्साहात स्वागत केला जाणार आहे. अशा स्थितीत काही अप्रिय घटना घडू नये, यासाठी पोलिसांचा शहरात खडा पहारा राहणार आहे. शहरातील अकोला टि पाईन्ट, यवतमाळ टि पाईन्ट, राजकमल चौक, राजापेठ चौक, बडनेरा नवी व जुनी वस्ती, नवाथेनगर, चित्रा चौक, पंचवटी चौक, वेलकम पाईन्ट, इतवारा बाजार, रहाटगाव, नांदगाव पेठ, जुना बायपास अशा आदी ठिकाणी पोलिसांचे फिक्स पाईन्ट लावले जाणार आहे. ठिकठिकाणी नाकाबंदी करून वाहनांच्या तपासणी केली जाणार आहे.

### पोलिसांची शहरात गश्त

नवर्षाच्या उत्साहात अनेक तरुण दुचाकी भरधाव चालवीतात. अनेक जण स्टंटरायडिंग करून स्वतास्‍सह नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण करतात. त्यामुळे स्टंटबाजी करणार्यांवरही पोलिसांचा वॉच राहणार आहे. पोलिसांची शहरात गस्त राहणार असून, या माध्यमातून स्टंटबाजी करणार्यावर लक्ष राहणार आहे.

### विविध पथके तैनात

नववर्षात तरुणाईच्या उत्साहाला उधाण येते. अशा स्थितीत अनेक तरुण हे तरुणींची छेडखाणी करतात. त्यांचा पाठलाग करून त्रास देतात. हे प्रकार टाळण्यासाठी पोलिसांची विविध पथके तयार राहणार आहे. दामिनी पथकही अशा टवाळखोरांवर लक्ष ठेऊन राहणार आहे.

### मद्यपींची होणार तपासणी

नववर्षाच्या स्वागतावेळी मद्यपी अति मद्यप्राशन करून धिंगाणा घालतात. भरधाव वाहने चालवून अपघात घडवितात. अशा प्रसंगी सर्व सामान्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. त्यामुळे यावर्षी पोलिसांनी मद्यपींवर विशेष लक्ष ठेऊन आहे. मद्यपींसाठी पोलिसांकडून ड्रन्क ॲन्ड ड्राईव्ह मोहिम राबविली जाणार आहे. ब्रिथ ॲनेलायझरद्वारे वाहनचालकांची तपासणी करून, त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. जे मद्यप्राशन करून गोंधळ घालतील, अशांना जेल सुध्दा हवा खाली लागणार आहे.



# दुचाकी चोरास अटक, आठ दुचाकी जप्त

### गाडगेनगर डि.बी. पथकाची कामगिरी

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** गाडगेनगर पोलिसांनी दुचाकी चोराला अटक करून, त्याच्या ताब्यातील 4 लाख 90 हजार रुपये किमंतीच्या आठ दुचाकी जप्त केल्या आहेत. वेदांत विनोद कोसले (25 वर्ष, रा.न्यु अंबीका नगर, मार्डी रोड, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी विनय कुमार रामनिवास शर्मा (वय 40 वर्ष, रा. जिजाउ नगर, संजय राउत यांच्या घरी भाडयाने राजुरा नाक्याजवळ, अमरावती) यांची बजाज कंपनीची व्ही–15 काळया रंगाची लाल पट्टा असलेली दुचाकी घराच्या कम्पाउंड समोरून चोराने लंपास केली. या घटनेच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरु केला होता. दरम्यान सदर गुन्हयाचा तपास करीत असतांना पोलिसांना गुप्त माहीती मिळाली की, सदर वाहनाची चोरी करणारा संशयीत आरोपी वेदांत विनोद कोसले आहे आणि तो नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे गेला आहे. या माहितीवरून पोलिसांनी आरोपी वेदांत कोसलेचा मोबाईल नंबर प्राप्त केला आणि त्याचे टॉवर लोकेशन प्राप्त केले. त्यानंतर पोलिसांचे पथक किनवट येथे पोहोचले आणि पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले. पोलिसांच्या चौकशीनंतर त्याने गाडगेनगर येथून 7 व फ्रेजरपुरा हद्दीतुन 1 दुचाकी चोरी केल्याची माहीती दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याला पोलिस ठाण्यात आणून त्याच्या जवळील दुचाकी जप्त केल्या. सदरची कार्यवाही पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त सागर पाटील, सहायक पोलिस आयुक्त अरूण पाटील व ब्रम्ह गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सदर कार्यवाही गाडगेनगर डि. बी. पथक प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक रमेश बाबर, पोलिस हवालदार संजय भेलावे, निलेश जुनघरे, गजानन बरडे, सुशांत प्रधान, सागर धरमकर व सिध्दार्थ शृंगारे यांनी केली आहे.

# मध्यस्ती करणे भोवले, धारदार शस्त्राने कान कापला

## गांधी चौकातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** अपघातग्रस्तांच्या वादात मध्यस्ती करणार्या अनोळखी इसमाने धारदार शस्त्राने वार केल्याने एकाचा कान कापल्या गेला. ही घटना शुक्रवारी सकाळी 11 वाजता गांधी चौकात घडली. अब्दुल शफी अब्दुल खालिक (वय 38, रा. पाटीपुरा, कमला ग्राउंड, पीएस नागपुरी गेट) असे जखमीचे नाव आहे. या घटनेच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहे.



शुक्रवारी सकाळी अब्दुल शफी हे गवंडी काम मिळवण्यासाठी गांधी चौकात उभे होते. दरम्यान तेथे नागपुरी गेट पोलीस स्टेशनच्या हद्दीत राहणारा अनोळखी इसम सुद्धा कामाच्या शोधात गांधी चौकात आला होता. त्यावेळी गांधी चौकात महिंद्रा मॅक्स व एका कारमध्ये किरकोळ अपघात झाला. या अपघातामध्ये अब्दुल शफी व तो अनोळखी मध्यस्ती करण्यासाठी गेले होते. महिंद्रा मॅक्स गाडीमध्ये जनावरे भरून होते आणि कार एक महिला चालवत होती. या दोघांमध्ये किरकोळ अपघातावरून गांधी चौकात वाद सुरु होता. दरम्यान हा वाद मिटवण्यासाठी अनोळखी इसम मध्यस्थी करायला लागला. त्यावेळी अब्दुल शफीने त्याला समजावून सांगितले की, मध्यस्थी करणं आपलं काम नाही. यावरून अनोळखी इसमाने धारदार शस्त्राने अब्दुल शफीवर वार केले. अब्दुल शफीने त्याचे पहिले दोन–तीन वार हुकविले, परंतू चौथा वार अब्दुल शफीच्या कानावर लागल्या आणि त्याचा कान कापून वेगळा झाला. यानंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला. त्यानंतर जखमीला काही नागरिकाच्या मदतीने ऑटोमध्ये बसून कोतवाली पोलीस स्टेशनला नेण्यात आले. त्यानंतर कोतवालीच्या पोलीस कर्मचाऱ्यांनी जखमीला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर वार्ड क्रमांक 16 मध्ये उपचार सुरू आहे. रात्री उशिरापर्यंत पोलीसांकडून आरोपीला अटक करण्यात आली नाही. जखमीला एफआयआर कॉपी मिळाली नसल्याचे सांगण्यात आले आहे.

# अज्ञात वाहनाने कट मारल्याने ट्रॅक्टर कोसळला खड्ड्यात

## तीन जण जखमी ■ पोटातील आतड्या आल्या बाहेर

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** भरधाव अज्ञात वाहनाने कट मारल्याने ट्रॅक्टर खड्डयात जाऊन कोसळल्याने तीन जण जखमी झाले. ही घटना लोणी ते नागझिरी मार्गावरील सावजीच्या धाब्याजवळ 27 डिसेंबर रोजी संध्याकाळी सात वाजताच्या सुमारास घडली. या अपघातात एका जखमीच्या पोटातील आतड्याच बाहेर निघाल्या होत्या. तशा स्थितीत जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते.




ट्रॅक्टर चालक विनोद मकनम राव (26) व त्याच्यासोबत राजू ओमीरामजी राव (21, दोन्ही राहणार गंगानगर, राजस्थान) हे ट्रॅक्टर घेऊन जात असताना, लोणी ते नागझिरी मार्गावरील सावजीच्या धाब्याजवळ त्यांच्या ट्रॅक्टरला अज्ञात वाहनाने कट मारला. त्यामुळे ट्रॅक्टर अनियंत्रीत होऊन रस्त्याच्या खाली उतरून दरीत जाऊन कोसळला. या अपघातात ट्रॅक्टर चालक गंभीर स्वरूपात जखमी असून सोबत असलेले दोन इतर जखमी झाले आहे. काही नागरिकांच्या मदतीने त्यांना औषध उपचार करण्यासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. ट्रॅक्टर चालकाच्या पोटातील आतड्या बाहेर निघून आल्या होत्या. तश्या स्थितीला तो रुग्णालयात पोहोचला. त्याची प्रकृती गंभीर असल्यामुळे त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिसरा जखमी हा गोपाल गणपत इंगोले (70 राहणार हिवरा, बुद्रुक, लोणी टाकळी) आहे. परंतू गोपाल या अपघातात जखमी झाला की त्याचे दुसरे कारण आहे. ही बाब पुढे आली नव्हती. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# मालमत्ताधारकांसाठी आता महापालिकेचा टोल फ्री क्रमांक

## तक्रारींचे निवारण करता येणार



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 28 ) –** मालमत्ताधारकांना कर भरताना येणाऱ्या अडचणी किंवा तक्रारींचे निवारण करण्यासाठी महापालिका प्रशासनाने आता टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून दिले आहे. दरम्यान, शहरातील मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ताधारकांना मालमत्ता कर ऑनलाइन भरण्याकरिता डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू.अमरावतीकॉप 'रिशन. इन', 'अमरावतीएमसी.इन' व 'अमरावतीएमसी. ऑर्ग' या महापालिकेच्या संकेतस्थळांवर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मालमत्ताधारकांना मालमत्ता कराचा भरणा करण्याबाबत कोणतीही तक्रार व मदत लागल्यास टोल फ्री क्रमांकावर शासकीय कार्यालयीन वेळेत संपर्क साधता येणार आहे. सोबतच %हेल्पडेस्क. अमरावती एमसी@जीमेल. कॉम या इमेल आयडीवर संपर्क करण्याचे आवाहन महानगरपालिका प्रशासनाने केले आहे.

# पोस्टाच्या गंगाजल योजनेला वाढता प्रतिसाद

## घरबसल्या मिळवा पवित्र गंगाजल – भाविकांसाठी सुविधा




> “गंगाजलला विशेष महत्त्व प्राप्त आहे. केंद्र सरकारच्या सूचनेनुसार पोस्टाने ही योजना सुरू केली आहे. ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष पोस्ट ऑफिसमधून तुम्ही गंगाजल घेऊ शकता. नागरिकांचा या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळतो आहे.
>
> **सुजित कुमार लांडगे, प्रवर पोस्ट मास्तर, मुख्य डाकघर अमरावती.**

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.28 )–** धार्मिक कामांसाठी गंगाजलचे महत्व आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गंगा नदीचे जल पवित्र मानले जाते. अनेक धार्मिक विधींमध्ये गंगाजलला विशेष महत्त्व आहे. पवित्र गंगाजल आणण्यासाठी आता भाविक भक्तांना गंगोत्री किंवा ऋषिकेशला जाण्याची गरज नाही.

डाक विभागामार्फत गंगोत्री येथील बाटलीबंद गंगाजल उपलब्ध करून दिले जाते. अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक पोस्ट ऑफिसमधून गंगाजल तुम्ही मिळवू शकता, ऑनलाइनदेखील मागवू शकता. 250 मिली गंगाजलच्या बॉटल या पोस्ट ऑफिस कार्यालयात उपलब्ध आहेत. तुमच्या घरापासून जवळच्या कुठल्याही पोस्ट ऑफिसमधून तुम्ही गंगाजल मागवू शकता, तसेच https://epostoffice.gov.in या संकेतस्थळावर खाते उघडून आपली मागणी नोंदवू शकता. गंगाजलच्या 250 मिली बॉटलसाठी 30 रुपये आकारले जातात. घरपोचही गंगाजलची बॉटल मिळते. त्यासाठी अधिकचे पैसे मोजावे लागतात. पोस्टाच्या माध्यमातून अमरावतीत एप्रिल 2024 ते डिसेंबर महिन्यापर्यंत 329 भाविकांनी गंगाजलाची मागणी केली आहे. गंगाजल ऑनलाइन ऑर्डर करता येते. त्यासाठी पोस्टाच्या वेबसाइटवर भेट देऊन नोंदणी करावी लागते. यानंतर घरपोच गंगाजल पुरविल्या जाते. परंतु त्यासाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. श्रावण महिना हा पूजाअर्चा करण्याचा महिना असतो. अनेक जण या महिन्यात अभिषेक करतात. त्यामुळे या महिन्यामध्ये गंगाजलाची मागणी वाढली असते. गंगाजल मागविण्यासाठी पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन नोंदणी करावी लागते किंवा पोस्टाच्या वेबसाइटवर मागणी नोंदविता येते.

# अंबाडा परिसरातील जंगलात वासराची शिकार

**महासागर प्रतिनिधी**
**परतवाडा, ( दि. 28 ) –** शहरानजिक असणाऱ्या अंबाडा–कांडली वन परिसरात एका हिंस्त्र प्राण्याने गोपाळ नंदवनशी यांच्या मालकीच्या एका वासराची शिकार केल्याचे उघडकीस आले. परतवाडा शहरातील रवीनगर परिसरात राहणारे गोपाळ नंदवनशी हे जनावरे घेऊन शेतात राहतात. त्याठिकाणाहून दूध काढून परतवाडा शहरात वितरण करत ते आपला उदरनिर्वाह करत असतात. पण काल रात्रीच्या सुमारास त्यांच्या शेतातील गोठ्याजवळ मोठ्या प्रमाणात कुत्रे भुंकतांना आढळून आले. तसेच त्याठिकाणी जनावरेसुद्धा जोराने हंबर्डे फोडत असल्याचे ऐकायला मिळाले. रात्रीची वेळ असल्यामुळे त्यांना काही दिसून आले नाही. परंतु सकाळी त्यांनी आपल्या जनावराच्या गोठ्यात जावून पाहणी केली असता एका गाईंचे वासरू हे कमी दिसून आले. त्यांनी ताबडतोब संपूर्ण परिसरात पाहणी केली तर त्यांच्या शेतापासून दोन शेत अंतरावर ते वासरू मृत अवस्थेत तसेच फडश्या पाडलेल्या अवस्थेत दिसून आले. त्यांनी ताबडतोब आपल्या मुलाला फोन लावून या घटनेची माहिती दिली. सदर घटना वाऱ्यासारखी परिसरात पसरली. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरिकांनी गर्दी केली तसेच वनपरिक्षेत्र परतवाडा यांना या घटनेची माहिती दिली. त्यांनीसुद्धा घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. याठिकाणी असणाऱ्या हिंस्त्र प्राण्यांमुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक –श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बीड-परभणी संयुक्त न्याय संघर्ष समितीचे आंदोलन

## संतोष देशमुख, सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांवर कारवाईची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 28)**- बीड-परभणी संयुक्त न्याय संघर्ष समिती अमरावतीच्या वतीने शनिवारी (दि.28) स्थानिक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक इर्विन येथे एक दिवसीय ठिय्या आंदोलन करण्यात आले. मसाजोग येथील माजी सरपंच संतोष देशमुख आणि परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय देण्याच्या मागणीसाठी झालेल्या या आंदोलनात सामाजिक, राजकीय, पुरोगामी तथा आंबेडकरी चळवळीतील पदाधिकारी आणि कार्यकर्ते शेकडोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

राज्यात गुन्हेगारीच्या घटना वाढलेल्या आहेत. यासाठी सरकारने कठोर पावले उचलणे आवश्यक आहे. सरपंच संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी त्यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ गजाआड करून कठोर शिक्षा द्यावी आणि शहीद भीमसैनिक सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय देऊन त्यांच्या परिवाराला दिलासा द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली. विविध पदाधिकारी व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले.

आंदोलनात अरविंद गावंडे, मनीष पाटील, जयंत इंगोले, भैय्यासाहेब मेटकर, दिनेश देशमुख, नितीन देशमुख, किशोर बोरकर, अंकुश डहाके, अनिकेत देशमुख, सागर देशमुख, बाळकृष्ण आढाऊ, अंबादास काचोळे, ठवरे, कैलास चव्हाण आदी प्रामुख्याने उपस्थित होते.दरम्यान या आंदोलनाला माजी आमदार बच्चू कडू यांनीही भेट दिली.

# शिवसेना पुन्हा जुन्या रुपात आणू!

## शिवसेना( उबाठा ) उपनेते सुधीर सूर्यवंशी यांचा विश्वास




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.28)** - विधानसभा निवडणुकीतील अपयश, पक्षफुट, आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शिवसेनेला आणखी मजबूत केले जाईल. शिवसेनेला जुने स्वरूप प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचा विश्वास उबाठा गट शिवसेना उपनेते सुधीर सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. शनिवारी आयोजित एका पत्रकार परिषदेत सूर्यवंशी बोलत होते.

जिल्ह्यात शिवसेनेच्या झालेल्या परिस्थिती बाबत त्यांनी सांगितले की, विधानसभा निवडणुकीमध्ये जिल्ह्यात फक्त एक आमदार विजयी झाले. पूर्वी अमरावती जिल्हा हा शिवसेनेचा गढ मानला जात होता. आज अशी स्थिती आली आहे की एका आमदाराच्या भरवशावर संपूर्ण जिल्ह्यात काम करायचे आहे. त्यामुळे नियोजन करणे देखील गरजेचे आहे. शिवसेनेच्या वतीने ज्या चुका झाल्या त्या चुका दुरुस्त करण्याचा प्रयत्न करुन गट तट विसरुन आम्ही जून्या नवीन कार्यकर्त्यांना एकत्रित आणू. पुन्हा जूनी शिवसेना तयार करण्यासाठी त्याचे नियोजन सुध्दा सुरु केले आहे. तळागाळातील शिवसैनिकांना वाव मिळेल आणि संगठन मजूबत होईल यावर जोर देणार आहे. आमदार गजानन लवटे यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांची चिखलदरा तालुक्यातील गावामध्ये कॉर्नर बैठक घेतली. माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्या निधनाने फक्त छोटेखानी बैठक घेण्यात आली. गावागावांत शिवसैनिक तयारच आहे मात्र त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. जिल्ह्यात उपनेते पदी नियुक्ती झाल्यानंतर जिल्ह्यात काम सुरु झाले आहे. मात्र सुधीर सूर्यवंशी यांची उपनेते पदावरुन हकालपट्टी झाल्याच्या बातम्या आल्यामुळे प्रश्नचिन्हे निर्माण झाले. माझी नियुक्त थेट पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी केली असल्यामुळे त्यांनीच ते पद काढल्याचे पत्र असते मात्र तसे काहीच न देता फक्त वावडया पसरविण्यात आल्या आहेत. इतकेच नव्हे तर जे कावळे सोडून गेले ते सुध्दा माझ्यामुळे गेल्याचे सांगण्यात आले. अशा अफवांमुळे मानसिक तणाव व मानहानी होते. त्यामुळे अशा प्रकारचे कुठलेही आदेश देण्यात आले नसून उपनेते पदावर कायम असल्याचे सुधीर सुर्यवंशी यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला आमदार गजानन लवटे, माजी नगरसेवक प्रदीप बाजड, अंकुश कावळकर युवा सेना जिल्हाप्रमुख, युवा सेना शहरप्रमुख शुभम जवंजाळ उपस्थित होते.

### चुका सुधारुन, नव्या शिवसैनिकांना जोडू!

झालेल्या चुका सुधारून शिवसेनेला जुने दिवस परत मिळविण्याकरिता शिवसैनिक जोडो अभियान जिल्ह्यात राबवू त्याची सुरुवात सुध्दा चिखलदरा येथून करण्यात आली आहे. चिखलदरा येथे आयोजित बैठकीमध्येच शिवसैनिक अजूही शिवसेने सोबत आहे हे दिसून चुकले. तळागाळातील शिवसैनिकांना वाव मिळेल. संगठना पुन्हा मोठी होईल. प्रत्येकाला विश्वासात घेवून काम करु. झालेल्या चुका सुधारण्यात येतील. नक्कीच पुन्हा गतवैभव शिवसेनेला मिळेल असा दावा आमदार गजानन लवटे यांनी केला

# माजी विद्यार्थी मेळाव्याने दिला शालेय जिवनातील आठवणींना उजाळा





**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि. 28)** - शहरातील न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे शताब्दी महोत्सवा दरम्यान आयोजीत माजी विद्यार्थी मेळाव्याने गेल्या काही शतकापूर्वीच्या शालेय जिवनातील आठवणींना उजाळा देत माजी विद्यार्थ्यांमध्ये एक उत्साह निर्माण करून दिल्याच्या प्रतिक्रिया अनेक माजी विद्यार्थ्यांनी माध्यमांशी बोलतांना विषद करीत शाळा प्रशासनाचे आभार मानले. न्यु इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल या शाळेने शंभर वर्ष पुर्ण करीत यावर्षी शताब्दी महोत्सव आयोजीत केला वॉटसँप गृपच्या माध्यमातून हजारो माजी विद्यार्थ्यांना जोडून त्यांना आमंत्रीत केले. माजी विद्यार्थी मेळाव्याला उपस्थित झालेल्या प्रत्येक माजी विद्यार्थाचे शाळेच्या प्राचार्या, शिक्षक, शिक्षिका व कर्मचारी वृंदांनी अविस्मरनीय स्वागत करीत अनेक दशकांपुर्वी एकमेकांपासुन दुर झालेल्या शालेय जिवनातील सर्व मित्र मैत्रिणींना एकत्र आनल्याने माजी विद्यार्थ्याचा आनंद गगनात मावेनासा दिसुन आला.

शाळा प्रशासनाने या सर्व माजी विद्यार्थ्याकरीता स्वरूची भोजनाची व्यवस्था केली. अनेक विद्यार्थ्यानी आप आपली ओळख करून देतांना काही दशकानंतर मिळालेल्या मित्रांना मिठी मारीत जुन्या आठवणींना उजाळा दिली. यावेळी अनिल देशमुख यांचे व्दारा आयोजीत नटराज कराओके ऑर्केष्ट्रा मध्ये अनेक माजी विद्यार्थी विद्यार्थीनींनी सुरेख आवाजात गाणी म्हणून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. इतकेच नव्हेतर ज्या शाळेत शिकुण आपण जिवनात यशाचे शिखर गाठले त्या शाळेला आपलेही काही देण लागते ही भावना ठेवत अनेक माजी विद्यार्थी विद्यार्थीनींनी शाळेकरीता रोख स्वरूपात धनादेश देउन आपले कर्तव्य बजावले. आणि हा माजी विद्यार्थी मेळावा शाळा प्रशासनाने दरवर्षी आयोजीत करून आम्हाला बोलविण्याची विनंती सुद्धा केली. या माजी मेळाव्याची स्तुती करीत सर्वच माजी विद्यार्थ्यांनी शाळा प्रशासनाचे आभार सुद्धा मानले. या माजी विद्यार्थी मेळाव्याच्या यशस्वीतेकरीता शाळेच्या प्राचार्या तारकेश्वरी सायर सर्व शिक्षक, शिक्षीका, कर्मचारी वृंद व सध्या शिकत असलेल्या विद्यार्थी विद्यार्थीनींनी अथक परिश्रम घेतले.

# भाऊसाहेबांच्या जयंतीनिमीत्त प्रभात फेरी



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,(दि.28)** - शिक्षण महर्षी कृषीरत्न डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेबदेशमुख यांच्या एकशे सव्वीसाव्या जयंती निमित्त दर्यापूर येथील शिवसंस्थेच्या सर्व शाळा महाविद्यालयांच्या संयुक्त सहभागातून भव्य दिव्य प्रभात फेरी काढण्यात आली.

आदर्श प्राथमिक शाळा, आदर्श बालक मंदिर, आदर्श स्वयं अर्थ सहायित इंग्रजी शाळा, रत्नाबाई राठी हायस्कूल, जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय या सर्व शाळा महाविद्यालयांच्या विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य तसेच शिवसंस्थेच्या आजीवन सभासदांचा उत्स्फूर्त सहभाग होता. विविध थोर पुरुषांच्या वेशभूषेतील विद्यार्थी, लेझीम पथक, एन.सी.सी.पथक, स्काऊट गाईड पथक, राष्ट्रीय हरित सेना पथक, राष्ट्रीय सेवा योजना पथक तसेच पारंपरिक दिंड्यांच्या सहभाग आजच्या प्रभात फेरीचे वैशिष्ट्य होते. रॅलीत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना डॉ पंजाबराव देशमुख विचारमंच दर्यापूर व श्री साईनाथ सेवा संस्थान,बनोसा दर्यापूर या संस्थांच्या वतीने खाऊ वितरित करण्यात आला. भाऊसाहेबांच्या जयघोषाने दर्यापूर नगरी दुमदुमून गेली होती.

# प्रभाकर निचत यांचे निधन



**अंजनगाव बारी**- जनता विद्यालयाचे माजी वरिष्ठ लिपिक, सामाजिक कार्यकर्ते तसेच विद्यमान ग्रामपंचायत सदस्या प्रणाली निचत यांचे वडील, वैभवशाली मंडळाचे संस्थापक अध्यक्ष व शेतकरी चळवळीतील सत्याग्रही अशी ओळख असणारे प्रभाकर महादेवराव निचत (80) यांचे दि.28 सकाळी पाच वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी व नातू,पंतू असा बराचसा परिवार आहे.

# स्व.कानफाडे स्मृती विद्यालयात क्रीडा महोत्सवाचा समारोप



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.28)**- श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित शिक्षण संस्थांमध्ये डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दोन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे आयोजन स्वर्गीय अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालयाच्या वतीने शासकीय क्रीडा संकुल मोर्शी येथे करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचा बक्षीस वितरण सोहळा अतिशय उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून स्वर्गीय अण्णासाहेब कानफाडे स्मृती विद्यालय मोर्शीच्या मुख्याध्यापिका एन.व्ही.गणगणे, प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे शाळा निरीक्षक निळकंठ यावले, श्री शिवाजी उच्च माध्यमिक शाळा मोर्शी येथील मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख, तसेच महिला शिक्षक निकम, पांडव यांच्यासह अन्य मान्यवर मंडळी उपस्थित होते. या महोत्सव अंतर्गत कबड्डी, हॉलीबॉल, खो-खो, लंगडी, धावणे, लांब उडी, गोळा फेक इत्यादी खेळाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत वरुड, मोर्शी, व चांदूरबाजार या तीन तालुक्यातील शिवाजी शिक्षण संस्थेअंतर्गत 14 शाळांच्या चमू सहभागी झाल्या होत्या. अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांनी विजयी संघाचे व खेळाडूंचे सन्मानचिन्ह व पदक देऊन अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक म्हणून क्रीडा शिक्षक डी.बी.ठाकरे यांनी संपूर्ण नियोजन केले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एन.सर्जे यांनी केले तर आभार प्रदर्शन महिला शिक्षक मुंदाने यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद यांनी प्रयत्न केले.

# ...तर उग्र आंदोलनाचे शस्त्र उपसू!

## मेंढपाळ बांधवांचा इशारा / माजी मंत्री महादेव जानकर, बच्चु कडूंचे समर्थन







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती (दि. 28)**- राज्यातील मेंढपाळ बांधवांनी नुकतेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मेंढपाळांच्या समस्यांवर तोडगा काढण्याची विनंती केली आहे, मात्र आजतागायत महायुती सरकारने मेंढपाळांच्या मागण्या निकाली काढण्याकरिता कुठलेही ठोस पाऊल उचलले नाही. त्यामूळे मेंढपाळ बांधवांनी उग्र आंदोलनाचे शस्त्र इशारा सरकारला दिला आहे. माजी मंत्री महादेव जानकर व बच्चू कडूंनी मेंढपाळ बांधवाच्या मागण्यांचे समर्थन करित त्यांच्यासोबत उभे राहण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती मेंढपाळ बांधवांनी शनिवारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत दिली.

शेळी-मेंढी पालन करून मेंढपाळांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पशुपालनाशिवाय दुसरे कोणतेही उदरनिर्वाहाचे ठोस साधन नाही. अश्या विपरीत परिस्थितीत आणि वाढत्या महागाईमध्ये मेंढपाळ बांधव शेळी, मेंढी पालन करतात. या सर्व महागाईचा व शासनाच्या कुटील धोरणाचा फटका मेंढपाळांना बांधवांना बसत आहे. शेळी मेंढीच्या आरोग्याचा तसेच विमा कवच देऊन त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ऐरणीवर आहे. मेंढपाळांच्या निवेदनाची गांभीर्याने 8 दिवसाच्या आत दखल घेऊन योग्य कार्यवाही न केल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर 'वाडा आंदोलन' करण्याचाइशारा पत्रकार परिषदेतून मेंढपाळ बांधवांनी दिला आहे. पत्रकार परिषदेला अवधुत कोरडकर, गुलाब ठोंबरे, भाऊराव ठोंबरे, धनराज गोरे, काळू यमगर, हरिष शिंदे, बाळू गोफणे, भिमराव महानर, निंबा महानर, संतोष घुले, योगेश कारंडे, सुनील कोरडकर, विशाल पिसाळ, हरिभाऊ महानर, लक्ष्मण आयनर, राजु कोकरे, सोनबा हटकर, पंजाब महानर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

### अश्या आहेत मागण्या

मेंढपाळांना आजही घरकुल योजनेचा लाभ नाही किंवा त्यांच्या पाल्यांना कोणत्याही शैक्षणिक सुविधा किंवा वसतिगृहाचा लाभ देखील मिळत नाही. भारताचे नागरिक असून सुद्धा केवळ मतांपुरता आमचा उपयोग घेतला जात असल्याचा आरोप मेंढपाळ बांधवांनी केला आहे. याशिवाय आपल्या निवेदनात मेंढपाळ बांधवांनी बाहेर राज्यातील कायम स्थानांतरित मेंढपाळांना चराईबंदी करण्यात यावी, जेणे करून त्यांच्यापासून होणाऱ्या रोग-राईपासुन पशुंचा बचाव होईल, भारतीय वन कायदा 1927 अन्वये बंदी घातलेले वनराई अधिकार उठवावे, शेळया मेंढ्यांच्या आकस्मिक मृत्यूची नुकसान भरपाई मिळावी, मेंढपाळ समुहाला वन हक्क अधिनियम 2006 अंतर्गत चराई करीता कुरणे विकास धोरणे राबविण्यात यावे, मेंढपाळ बांधवा वरील अन्याय थांबून खोटया केसेस मागे घेण्यात याव्या, मेंढपाळ बहुल तालुक्यात शेळया मेंढयाचे मोबाईल हॉस्पीटल तयार करण्यात यावे, नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षणा करीता मेंढपाळ कुंटुबांना अत्याधुनिक तंबू, साहीत्य, औषध वितरीत करण्यात यावे.मेंढपाळ बांधवांच्या शेळयामेंढ्याचा 1 रुपया प्रमाण विमा कवच उपलब्ध करुन दयावे, अमरावती विभागात पशूनिहाय पशुगणना करावी, मेंढपाळ बांधवांच्या संपूर्ण शेळया मेंढयाचे दर तिन महिन्यांनी आरोग्य तपासणी करण्यात यावी, शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीत आजारनिहाय शेळी-मेंढी लसीकरण शिबीरे आयोजीत करण्यात यावे,मेंढपाळाच्या मुलांसाठी वसतीगृह निर्मीती करणे व चांगल्या शैक्षणीक सुविधा द्याव्यात, मेंढपाळांना विशेष बाब म्हणून घरकुल उपलब्ध करून स्थायी निवारा देण्यात यावा. आंतरराज्यीय सिमेवर असणारे पशुसंवर्धन विभागाचे तपासणी नाके (चेकपोस्ट) वरील झालेल्या कार्यवाहीचा मागील दोन वर्षाचा वस्तुनिष्ठ अहवाल याबाबत पाठपुरावा करावा अश्या मुख्य मागण्या मेंढपाळ बांधवांनी केलेल्या आहे.

# डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या 126 व्या जयंती उत्सवानिमित्य भव्य शोभायात्रा

### शोभायात्रेने दुमदुमले चांदूर रेल्वे शहर



**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,(दि.28)**- श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या 126 व्या जयंती उत्सवानिमित्त 23 ते 27 डिसेंबर पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. त्या कार्यक्रमाला अनुसरून 26 डिसेंबर रोजी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त चांदूर रेल्वे शहरातून भव्य स्वरूपात भाऊसाहेबांची रथयात्रा (शोभायात्रा) काढण्यात आली.

रथयात्रेमध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांचा रथ पुष्पांनी सजवण्यात आला होता. तसेच शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषा धारण करून शोभायात्रेला आणखी आकर्षित बनविले. यामध्ये लेझीम पथक, बँड पथक, स्काऊट गाईड पथक तसेच छत्रपती शिवाजी महाराज, झाशीची राणी, संत गाडगेबाबांच्या भूमिकेत विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. यामध्ये मुख्य आकर्षण मराठी चित्ररथाने केले, त्यामध्ये विठ्ठल रुक्मिणी सोबत मराठमोळ्या पोशाखामध्ये दैनंदिन घरकाम करणाऱ्या स्त्रियांचे पात्र रंगविण्यात आले होते. त्याचबरोबर भाऊसाहेबांची पालखी सोबत वारकरी संप्रदायाची भजने विद्यार्थ्यांनी सादर केली. तसेच शेतकऱ्यांची झाकी बैलगाडीतून काढण्यात आली. गावामधून प्रभात फेरी काढत असतांना विद्यार्थ्यांनी भाऊसाहेबांचे गौरव गीत व घोषवाक्यांनी परिसर दणाणून सोडला. याशिवाय स्वच्छतेचा संदेश देत गाडगेबाबांची वेशभूषा धारण करून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा व सर्वधर्मसमभाव चा संदेश या माध्यमातून नागरिकांना दिला.

विद्यार्थ्यांनी केलेल्या या विविध वेशभूषेमुळे परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते. अशा या भव्य दिव्य रथयात्रेचा शाळेमध्ये समारोप करण्यात आला. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीव सभासद अशोकराव देशमुख होते तर प्रमुख अतिथी शाळेचे मुख्याध्यापक अशोक मोटघरे व पर्यवेक्षक विठ्ठल नवरे उपस्थित होते. सदर प्रभात फेरी यशस्वी करण्याकरिता प्रभात फेरीचे प्रमुख क्रीडा शिक्षक एस. टी. तायडे यांसोबत शाळेतील शिक्षक एम. एम. जामनिक, एस. व्ही. पाटील, वाय. डी. कोठाडे, एस. एन. पुनसे, पी. एस. देशमुख, तेजस काळे, कांबळे, एस. जी. उदापुरे, एस. व्ही. मायंदे, एस. व्ही. बारब्दे, जे. बी. शेंदुरजने, जे. बी. ठाकरे, महिला शिक्षक खोडे, धर्माळे, बनसोड, घोरपडे, शितल देशमुख, निकिता डोळस तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी दारासिंग राठोड, लव्हाळे, कदम, इंगळे, देशमुख व शाळेतील विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.